मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# स्व-गणना केलेल्या नागरिकांनी 'SE ID' गणनाकारांना द्यावा

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आवाहन..., गणनाकारांकडून मान्यता मिळाल्यानंतरच प्रक्रिया पूर्ण मानली जाणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील 'घरयादी आणि गृहगणना' प्रक्रिया सुरू असून, स्व-गणना पूर्ण केलेल्या नागरिकांनी त्यांना प्राप्त झालेला एसई आयडी (SE ID) संबंधित गणनाकारांना द्यावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने केले आहे.

१६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत नियुक्त गणनाकार नागरिकांच्या घरी भेट देऊन स्व-गणनेत सादर केलेल्या माहितीची पडताळणी व पुष्टीकरण करणार आहेत. गणनाकारांकडून मान्यता मिळाल्यानंतरच प्रक्रिया पूर्ण मानली जाणार आहे.




उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी नागरिकांची माहिती अत्याधुनिक सायबर सुरक्षेसह सुरक्षित सरकारी सर्व्हरवर संग्रहित केली जात असल्याचे सांगितले. तसेच नागरिकांनी केवळ अधिकृत संकेतस्थळाचाच वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कोंडीमुक्त करण्यासाठी नवीन पार्किंग पॉलिसी; स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांची माहिती

## बैठकीत शहरी दळणवळण विभागाकडून नवीन पार्किंग पॉलिसीचे सादरीकरण करण्यात आले

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील वाढती वाहनांची संख्या आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी शहरात सक्षम पे अॅण्ड पार्क पार्किंग पॉलिसी राबवली जाणार आहे. महापालिका आणि पोलिस प्रशासन यांच्या समन्वयाने हे नवे धोरण लवकरच शहरात अंमलात आणले जाणार आहे, अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी दिली.



महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीस सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनील पवार, आयटीडीपीचे प्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शहरी दळणवळण विभागाकडून नवीन पार्किंग पॉलिसीचे सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरणामध्ये धोरणाची तांत्रिक आणि व्यावहारिक बाजू मांडण्यात आली. त्यावर सर्व बाजूंनी चर्चा झाल्यानंतर, धोरण अधिक लोकाभिमुख आणि त्रुटीरहित करण्यासाठी काही महत्त्वाच्या ठिकाणी आवश्यक दुरुस्त्या व सुधारणा करण्याच्या सूचना अभिषेक बारणे यांनी केल्या. त्या सूचनांचा समावेश करून हे नवीन पार्किंग धोरण लवकरच अंमलात आणले जाणार आहे.

नव्या पार्किंग धोरणामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा व व्यावहारिक उपायांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रत्येक भागाच्या गरजेनुसार एरिया बेस्ड पार्किंग व्यवस्था विकसित केली जाईल.

नागरिकांच्या सोयीसाठी कलर कोडिंग सिस्टीम लागू केली जाणार आहे. रस्त्यालगत घर असणाऱ्या स्थानिक रहिवाशांना त्रास होऊ नये म्हणून त्यांना विशेष पार्किंग परमिट दिले जाईल. शहरातील मुख्य रस्त्यांवर होणारी जड वाहनांची पार्किंग पूर्णपणे बंद करून त्यांच्यासाठी शहराबाहेर जागा निश्चित केली जाणार आहे.

अनावश्यक पार्किंग टाळण्यासाठी थेट सॅटेलाईटद्वारे जागांची पडताळणी करण्यात येणार आहे. या संपूर्ण व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र पार्किंग मॅनेजमेंट कक्ष स्थापन केला जाईल. या धोरणात वाहनचालकांसह पादचारी आणि सायकलस्वारांसाठीही स्वतंत्र व सुरक्षित जागा निश्चित करण्यात आली आहे.

### सर्वसामान्यांवर आर्थिक भार पडणार नाही

» नवीन पार्किंग पॉलिसी राबवताना केवळ वाहतूक सुरळीत करणे एवढाच हेतू नसून, पादचारी आणि सायकल चालवणाऱ्यांनाही सुरक्षित रस्ते मिळवून देण्याचा प्रयत्न आहे. ऑन स्ट्रीट आणि ऑफस्ट्रीट पार्किंगचे दर ठरवताना सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडणार नाही याची काळजी घेतली जाईल. सर्व तांत्रिक त्रुटी दूर करून, उत्तम पार्किंग पॉलिसी लवकरच नागरिकांच्या सेवेत आणले जाईल, असे स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी सांगितले.

### पे अॅण्ड पार्क पार्किंग पॉलिसी

» तत्कालिन आयुक्त राजेश पाटील यांच्या काळात शहरात पे अॅण्ड पार्क पार्किंग पॉलिसी सुरू करण्यात आली होती. मात्र, वाहनचालकांचा कमी प्रतिसाद, वाहतूक पोलिसांचा असहकार, ठेकेदारांचा नकारात्मक प्रतिसाद, प्रशासनाची धरसोड वृत्ती आदी कारणांमुळे ते धोरण गुंडाळण्यात आले होते. त्यावर महापालिकेने लाखो रुपयांचा खर्च केला होता. आता नव्याने सक्षम पॉलिसी राबवण्यात येत असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

# पहिल्याच पावसात दाणादाण; अवघ्या तासाभरात शहर जलमय

## शहरातील काही भागांमध्ये ड्रेनेजच्या झाकणांमधून मोठ्या प्रमाणात पाणी बाहेर पडत होते.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात शुक्रवारी (दि. 22) झालेल्या केवळ 32 मिनिटांच्या पावसाने अनेक भाग जलमय झाले. नाले तुडुंब भरल्याने ड्रेनेजची झाकणे उघडली गेली. तसेच, ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर आल्याने अनेक भागांतील वाहतूक विस्कळीत झाली होती. त्यामुळे प्रशासनाच्या नालेसफाईच्या दाव्यावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे

पावसाचा जोर वाढताच शहरातील अनेक प्रमुख नाले आणि स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज व्यवस्था अपुरी पडल्याचे चित्र दिसून आले. नाल्यांमधील साचलेला गाळ, कचरा, झुडपे आणि वेळेत न उचललेला राडारोडा यामुळे पाण्याचा प्रवाह मंदावला होता. परिणामी पाणी रस्त्यांवर साचू लागले. अनेक ठिकाणी नाले भरून वाहू लागल्याने गटारांचे पाणी थेट रस्त्यावर आले. रस्त्यावर साचलेल्या पाण्यातून दुचाकीस्वार, वाहनचालक आणि पादचारींना मोठी कसरत करत मार्ग काढावा लागला.

शहरातील काही भागांमध्ये ड्रेनेजच्या झाकणांमधून मोठ्या प्रमाणात पाणी बाहेर पडत होते. गटारातील घाण, प्लास्टिक, कचरा आणि चिखल रस्त्यावर आल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती. नागरिकांना अक्षरशः दूषित पाण्यातून चालावे लागले. यामुळे डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो आणि त्वचारोगांसारख्या साथींचा धोका वाढण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

शहरवासीयांमध्ये प्रशासनाच्या तयारीबाबत तीव नाराजी व्यक्त होत आहे. अवकाळी पावसाने ही अवस्था असेल तर, पावसाळा सुरू झाल्यानंतर परिस्थिती किती गंभीर होईल, याची चिंता नागरिकांना सतावत आहे. शहरातील पूरप्रवण भाग, तुंबलेले नाले, अतिक्रमणांनी अरुंद झालेले प्रवाह आणि अपुऱ्या स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज व्यवस्थेकडे तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत. अन्यथा प्रत्येक पावसात शहरवासीयांना याच समस्यांचा सामना करावा लागणार आहे.



### नालेसफाईच्या कामावर शंका

» महापालिकेकडून नालेसफाईचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा दावा करण्यात आला होता. तसेच, शहरातील सुमारे 70 टक्के नालेसफाई पूर्ण झाल्याचेही सांगण्यात आले होते. मात्र, अवघ्या 32 मिनिटांच्या पावसातच शहरातील परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याने प्रत्यक्षात नालेसफाई कितपत प्रभावी झाली, याबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

### अपघाताचा धोका

» चिखली, देहूरोड, निगडी, कासारवाडी, आळंदी आणि पिंपरी समाट चौक परिसरात परिस्थिती अधिक गंभीर होती. काही भागांमध्ये रस्ते आणि नाले यामधील फरकच ओळखणे कठीण झाले होते. पाण्याचा निचरा न झाल्याने अनेक चौक आणि अंतर्गत रस्ते पाण्याखाली गेले. काही वाहनांचे इंजिन बंद पडल्याच्या घटना घडल्या. तर, अनेकांना वाहन ढकलत सुरक्षित स्थळी न्यावे लागले. अनेक ठिकाणी नाल्यांमधील पाणी थेट रस्त्यावर आल्याचे दिसून आले. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### पावसाने उघड केलेले वास्तव

- अनेक भागांमधील नाले तुडुंब भरले
- ड्रेनेजची झाकणे उघडून गटारयुक्त पाणी रस्त्यावर
- प्रमुख चौक आणि अंतर्गत रस्त्यांवर पाणी साचले
- दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांची मोठी गैरसोय
- तुटलेल्या कठड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला
- नालेसफाईच्या दाव्यांवर नागरिकांकडून प्रश्नचिन्ह

# उद्घाटनानंतर दुसऱ्याच दिवशी रक्षक चौकातील उड्डाणपूलावर अपघात

## महापालिका प्रशासनाचा निष्काळजीपणा; खासदार श्रीरंग बारणे यांचा आरोप

**पिंपरी | प्रतिनिधी**

औंध-रावेत बीआरटी. रोडवरील रक्षक चौकातील उड्डाणपुलावर उद्घाटनाच्या दुसऱ्याच दिवशी अपघात झाला. तीव्र उतारामुळे चालकाचे नियंत्रण सुटून मोटार पलटी झाली. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याला महापालिका प्रशासनाचा निष्काळजीपणा कारणीभूत असल्याचा आरोप खासदार श्रीरंग बारणे यांनी केला आहे.





या पुलाची खासदार श्रीरंग बारणे यांनी पाहणी केली होती. महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षिततेची काळजी घेतली नव्हती.तीव्र उतारामुळे भविष्यात अपघात होतील, अशी भीती व्यक्त केली होती. परंतु, प्रशासनाने दुर्लक्ष केले. शुक्रवारी पुलाचे उद्घाटन झाले. त्यानंतर दुसऱ्यादिवशी शनिवारी अपघात झाला. तीव्र उतारामुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला. मोटार पलटी झाली. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. परंतु, तीव्र उतारामुळे भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भविष्यात मोठा अपघात झाल्यास पुण्यातील नवले पुलासारख्या दुर्घटना घडू शकतात.

याबाबत खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, या पुलाच्या तांत्रिक त्रुटी मी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. उद्घाटनाच्या दुसऱ्याच दिवशी प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे अपघात झाला आहे. या अपघातात सुदैवाने जीवितहानी झाली नाही. परंतु, भविष्यात नागरिकांच्या जीवाशी खेळू नये. त्यामुळे महापालिका प्रशासनाने उतारामध्ये दुरुस्ती करावी, वेळ गेली नाही.

# काळेवाडीचा सर्वांगीण कायापालट करणार : आमदार शंकर जगताप

## विनोद नढे यांच्या पुढाकाराने काळेवाडीच्या विकासाला गती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील विकासाच्या दृष्टीने उपेक्षित राहिलेल्या काळेवाडी परिसराचा येत्या दोन वर्षांत सर्वांगीण कायापालट करण्याचा निर्धार आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला. चिंचवड येथील ऑटो क्लस्टरमध्ये महापालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.



प्रभाग क्रमांक २२ चे नगरसेवक विनोद नढे यांच्या पुढाकारातून आयोजित या बैठकीत काळेवाडी परिसरातील विविध विकासकामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विकास आराखडा, रखडलेली आरक्षणे, रस्ते, नाले, पाणीपुरवठा, स्वच्छता, उद्याने, क्रीडांगणे आणि रुग्णालय यांसारख्या मूलभूत सुविधांबाबत नियोजन करण्यात आले

नगरसेवक विनोद नढे यांनी सांगितले की, महापालिकेच्या धोरणांमुळे काळेवाडी परिसर अनेक वर्षे विकासापासून वंचित राहिला. मात्र आता आमदार शंकर जगताप यांनी स्वतः पुढाकार घेत अधिकाऱ्यांना नियोजनबद्ध विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

"काळेवाडीचा विकास करताना नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यावर विशेष भर दिला जाणार आहे," असेही विनोद नढे यांनी स्पष्ट केले. या बैठकीला महापालिकेचे विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. काळेवाडी परिसरातील प्रलंबित प्रश्न सोडवून विकासकामांना गती देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# महापालिकेत प्रशासकीय बदल्यांमुळे कार्यक्षमतेला चालना

## कामकाजात सुधारणा करण्यासाठी आयुक्तांचे पाऊल; प्रशासनात नव्या जबाबदाऱ्यांची तयारी

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी तीन दिवसांपूर्वी प्रशासकीय कारणास्तव केलेल्या अधीक्षक अभियंता तसेच कार्यकारी अभियंत्यांच्या बदल्या रद्द करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. बदली रद्द करण्यासाठी अधिकाऱ्यांकडून महापालिकेत सत्ताधारी असलेल्या भाजपच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेतली जात आहे. 'सांगाल ते करू पण बदली थांबवा' असे साकडे पदाधिकाऱ्यांना घातले जात आहे.

प्रशासकीय कामकाजात सुधारणा व्हावी तसेच वर्षानुवर्षे एकाच खात्यात बस्तान मांडून बसलेल्या आणि चर्चेचा विषय झालेल्या अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंत्यांच्या बदल्या महापालिका आयुक्त राम यांनी तीन दिवसांपूर्वी केल्या आहेत. मात्र, यातील काही अभियंत्यांकडून अद्यापही आपला पदभार सोडण्यात आलेला नाही. बदली होऊन आलेल्या अधिकारी जबाबदारी घेऊ नये, यासाठी काही अभियंत्यांनी तर चक्क आपल्या कार्यालयाला कुलूपच लावले आहे.

महापालिका आयुक्त राम यांनी केलेली बदली रद्द करावी, यासाठी काही अधिकाऱ्यांनी महापालिकेत सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे उंबरे झिजविण्यास सुरुवात केली आहे. विकास कामात आवश्यक ती मदत करतो, पण झालेली बदली रद्द करा, असे साकडे काही अधिकाऱ्यांनी पदाधिकाऱ्यांना घातले आहे.

महापालिका आयुक्तांनी अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश १९ मे रोजी काढले आहेत. मात्र, तीन दिवसानंतर देखील अनेकांनी पदभार सोडलेला नाही. त्यातच आता शनिवारी आणि रविवारी महापालिकेला सुट्टी असल्याने नवीन अधिकाऱ्यांना सोमवार नंतरच बसण्यास कार्यालये मिळणार आहेत. प्रशासकीय कामात सुधारणा व्हावी यासाठी आयुक्तांनी या बदल्या केल्या आहेत.

यामध्ये भवन, मलनिसारण, बांधकाम विभागांचा समावेश आहे. भवन, मलनिसारण विभागातील आठ जणांची बदली आयुक्तांनी केली आहे. मात्र यातील तीन ते चार अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयाला चक्क कुलूप लावले आहे.



### प्रशासनात कार्यक्षमतेसाठी बदल्यांचे पाऊल

» **महापालिका प्रशासनातील कामकाज अधिक गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी आयुक्त नवल किशोर राम यांनी विविध विभागांतील अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. वर्षानुवर्षे एकाच विभागात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना नवीन जबाबदाऱ्या देऊन प्रशासनात कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. भवन, मलनिसारण आणि बांधकाम विभागात नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्याने प्रलंबित कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. बदल्यांमुळे प्रशासनातील समन्वय वाढून विकासकामे अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होईल, असा विश्वास महापालिका प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे.**

### नव्या जबाबदाऱ्यांमुळे विकासकामांना वेग

» **महापालिकेतील बदल्यांमुळे विविध विभागांमध्ये नव्या पद्धतीने कामकाज सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनुभवी अधिकाऱ्यांना नवीन विभागांची जबाबदारी देण्यात आल्याने विकासकामांमध्ये गती आणि गुणवत्ता वाढण्याची अपेक्षा आहे. विशेषतः बांधकाम, मलनिसारण आणि भवन विभागातील प्रलंबित प्रकल्पांना नव्या नेतृत्वामुळे चालना मिळू शकते. प्रशासनात नियमित बदल आवश्यक असल्याचे मत अनेक जाणकारांनी व्यक्त केले असून, यामुळे निर्णयप्रक्रिया अधिक प्रभावी होण्यास मदत होईल. शहराच्या विकासासाठी प्रशासनातील सकारात्मक बदल महत्त्वाचे ठरत असल्याचेही बोलले जात आहे.**

### पारदर्शक प्रशासनासाठी आयुक्तांचे प्रयत्न

» **महापालिका प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी आयुक्तांनी केलेल्या बदल्यांकडे महत्त्वाच्या पावलाच्या स्वरूपात पाहिले जात आहे. विविध विभागांमध्ये नवीन अधिकारी आल्यानंतर कामकाजाचा नव्याने आढावा घेतला जाणार असून, नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासकीय यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी वेळोवेळी बदल आवश्यक असतात, असे प्रशासनातील सूत्रांचे मत आहे. या निर्णयामुळे शहरातील पायाभूत सुविधा आणि नागरी सेवांच्या कामांना अधिक गती मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.**

# पावसामुळे शहरात वाहतुक कोंडी.! रस्ते जलमय, ठिकाठिकाणी वाहतूक कोंडी

## वादळी वाऱ्यासह पूर्वमोसमी पावसाने अनेक रस्ते जलमय झाले आणि महामार्गासह शहरातील प्रमुख रस्ते वाहतूक कोंडीत अडकले.

**पुणे | प्रतिनिधी**

वादळी वाऱ्यासह पूर्वमोसमी पावसाने अनेक रस्ते जलमय झाले आणि महामार्गासह शहरातील प्रमुख रस्ते वाहतूक कोंडीत अडकले. अनेक ठिकाणी गुडघाभर पाणी साचल्यामुळे वाहतुक मंदावली तर सोसायट्यांसह दुकानांमध्ये पाणी घुसल्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली.

दुपारनंतर आकाशात काळे ढग भरून आल्यानंतर काळोख दाटला होता. त्यानंतर विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरवात झाली. रस्त्यांना ओढे-नाल्याचे स्वरूप आले. काही ठिकाणी गुडघारभर पाणी साचल्यामुळे वाहतुक मंदावली तर रस्ते निसरडे झाले.

पावसाला सुरवात होताच कामावरून घरी जाणाऱ्या चाकरमान्यांची तारांबळ उडाली. पाऊस आणि वादळी वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी दुचाकीस्वारांनी उड्डाणपुलांखाली, बस थांब्यांवर आणि रस्त्याच्या कडेला आडोश्याला वाहने उभी केली. यामुळे आधीच अरुंद झालेल्या रस्त्यांवर वाहनांच्या किलोमीटरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

शहराच्या मध्यवर्ती भागास सेनापती बापट रोड, चांदणी चौक ते भुगाव रोड, पौड रोड, कर्वे रोड, डेक्कन, सातारा रोड, फातिमानगर, मुंढवा, चंदननगर, हडपसर, बंडगार्डन, बाणेर रोड, वाकड, हिंजवडी, बालेवाडी, सुस सह महामार्ग आणि सर्व्हिस रस्त्यावर वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर झाली. त्यामुळे २० मिनिटाच्या अंतरासाठी तासभर वेळ गेल्याने नागरिकांची चीडचीड झाली. कोंडी सोडविताना वाहतूक पोलिसांची चांगलीच दमछाक झाली. या खड्डयांमुळे वाहतुक कोंडीत आणखीन भर पडली. तर काही ठिकाणी झाडपडीच्या घटना घडल्या असून, यामध्ये जिवीतहानी झाली नसल्याचे प्राथमिक माहिती अग्निशामक दलाकडून दिली.



### खोदकामाने चिखल, अडथळा

» **शहरात ठिकठिकाणी महापालिकेकडून पावसाळापूर्व कामे तर खासगी कंपन्यांकडून केबल टाकण्याचे काम सुरू असून, ठिकठिकाणी रस्ते खोदून ठेवले आहेत. आज दुपारनंतर झालेल्या पावसामुळे खोदलेले खड्डे पाण्याने भरले.सर्व माती रस्त्यावर आल्यामुळे रस्ता धोकादायक झाला. काही भागात रिमझिम पाऊस सुरू झाल्यावर रस्ते निसरडे झाले. परिणामी वाहने घसरून पडण्याच्या घटना घडल्या.**

# धरणसाठा घटल्याने भोर तालुक्यात पाणीटंचाईचे संकट

## भाटघरमध्ये केवळ 10 टक्के पाणीसाठा; नागरिकांना दिवसाआड पाणीपुरवठा, शेतकऱ्यांची मान्सूनकडे आशा

**पुणे | प्रतिनिधी**

भाटघर, निरा-देवघर धरणांमधून उन्हाळी आवर्तन सोडण्यात आल्याने धरणांनी तळ घाटला आहे. यामध्ये भाटघर धरणात 10.53, तर निरा-देवघर धरणात 24.12 टक्के पाणीसाठा उरला असल्यामुळे धरणावर असणाऱ्या पाणी योजनांवरील गावांना पाणीटंचाईचे संकट उभे राहिले आहे. परिणामी, शेतकऱ्यांना मान्सूनची प्रतीक्षा लागून राहिली आहे.

धरणांतून गेल्या तीन महिन्यांपासून होत असल्याने सततच्या पाणी विसर्गामुळे धरणातील पाणीपातळी खालावली असून, धरणाचे बुडीत क्षेत्र कोरडे पडू लागले आहे. 24 टीएमसी एवढी भाटघर धरणाची पाणी साठवण क्षमता असून, भोर, खंडाळा, पुरंदर, बारामती, इंदापूर, फलटण यांसह सोलापूर जिल्ह्यातील काही तालुक्यांमधील शेतीला आणि गावांना या धरणातून पाणीपुरवठा होतो. दुसरीकडे 12 टीएमसी असलेल्या नीरा-देवघर धरणाचे पाणी भोर, खंडाळा, फलटण तालुक्यातील शेतीला व पिण्याच्या पाण्यासाठी उपयोगी ठरते.

यंदा पाऊस वेळेवर दाखल न झाल्यास धरणाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या तालुक्यांमध्ये पाणी टंचाईचे संकट ओढवण्याची शक्यता आहे. धरणांच्या पाणीपातळीत घट झाल्याने धरण क्षेत्रातील काही विहिरींनी तळ गाठला आहे. त्यामुळे धरणाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या गावांना पाणीटंचाई जाणवू लागली आहे.

यंदाच्या उर्वरित पाणीसाठ्यातून पाणीटंचाईचे संकट टाळण्यासाठी पुढील काळात योग्य नियोजन करून धरणात मुबलक पाणीसाठा ठेवण्याची मागणी तालुक्यातील ग्रामस्थांकडून होत आहे.

भोर शहराला भाटघर धरणातून वर्षभर पाणीपुरवठा केला जातो. सध्या धरण क्षेत्रातील पाणीपातळी घटून 10 टक्के म्हणजे अत्यल्प पाणीसाठा उरला असल्याने भोर शहराला दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. भोर शहरातील नागरिकांनी पाण्याचा अपव्यय न करता पाणी वापर करावा, असे आवाहन नगरपालिका पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे.



### दिवसाआड पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त

**» भोर शहराला भाटघर धरणातून वर्षभर पाणीपुरवठा केला जातो. मात्र धरणातील अत्यल्प पाणीसाठ्यामुळे सध्या शहरात दिवसाआड पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे. पाणीपुरवठ्याच्या वेळेत कपात झाल्याने नागरिकांना पाण्याचे नियोजन करून वापर करावा लागत आहे. अनेक भागांत टाक्यांमध्ये पाणी साठवण्यासाठी नागरिकांची धावपळ सुरू आहे. नगरपालिका प्रशासनाने नागरिकांना पाणी वाचविण्याचे आवाहन केले असून, अनावश्यक पाणी वापर टाळण्यास सांगितले आहे. पावसाळा वेळेवर सुरू न झाल्यास आणखी कठोर उपाययोजना कराव्या लागू शकतात, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.**

### भाटघर धरणातील पाणीसाठा धोक्याच्या पातळीवर

**» भाटघर धरणातील पाणीसाठा अवघ्या 10.53 टक्क्यांवर आल्याने भोर तालुक्यातील पाणीपुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. उन्हाळी आवर्तनासाठी सतत पाणी सोडण्यात आल्यामुळे धरणाची पातळी झपाट्याने खाली गेली. धरणावर अवलंबून असलेल्या अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची चिन्हे दिसू लागली आहेत. काही ठिकाणी विहिरींनी तळ गाठल्याने नागरिकांना पर्यायी व्यवस्था करावी लागत आहे. प्रशासनाकडून पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करण्यात येत असून, पुढील काही दिवसांत पाऊस न झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे.**

### मान्सूनकडे शेतकऱ्यांचे लागले डोळे

**» भाटघर आणि निरा-देवघर धरणांतील घटलेला पाणीसाठा पाहता शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे. भोर, खंडाळा, फलटण, पुरंदर आणि बारामतीसह अनेक तालुक्यांतील शेती या धरणांवर अवलंबून आहे. पाण्याअभावी उन्हाळी पिकांवर परिणाम झाला असून पुढील हंगामासाठीही अनिश्चितता निर्माण झाली आहे. अनेक शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व तयारी थांबवली असून आता सर्वांचे लक्ष मान्सूनकडे लागले आहे. वेळेवर आणि चांगला पाऊस झाल्यासच धरणसाठा वाढून शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकणार असल्याचे मत ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.**

# ‘मिसिंग लिंक’नंतर आणखी मोठा प्रकल्प! मुंबई ते पुणे प्रवास केवळ 90 मिनिटांत

## नवीन पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग 130 किलोमीटर लांबीचा असणार हा महामार्ग रायगड जिल्ह्यातील चौक येथून सुरू होणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

अलीकडच्या काळात मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अनेक गंभीर अपघात आणि वाहतूक कोंडीच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे या मार्गाला समांतर असा नवीन द्रुतगर्ती मार्ग उभारण्याच्या हालचाली शासकीय पातळीवर सुरू झाल्या आहेत. या नवीन मार्गाचा प्रकल्प विकास आराखडा आणि व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने निविदा मागविल्या आहेत. या नवीन मार्गामुळे मुंबई ते पुणे हे अंतर केवळ ९० मिनिटांत पार करता येणार आहे.

नवीन पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग १३० किलोमीटर लांबीचा असणार आहे. हा महामार्ग रायगड जिल्ह्यातील चौक येथून सुरू होणार आहे. जेएनपीटी बंदर (पागोटे) ते चौक या महामार्गाशी हा मार्ग जोडला जाईल. हा नवीन मार्ग चौकपासून थेट पुणे बाह्यवळण मार्गावर भोरमधील शिवरे गावाशी जोडला जाणार आहे. या नव्या मार्गामुळे पुणे हे अटल सेतूशी जोडले जाणार आहे. सध्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाढती वाहतूक, अपघात आणि सततची कोंडी ही मोठी समस्या बनली आहे. नव्या मार्गामुळे सध्याच्या द्रुतगती मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च १५ हजार कोटी रुपये असणार आहे.

नवीन मुंबई-पुणे द्रुतगती प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल आणि व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने निविदा मागवल्या आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकल्प हा मार्ग आठपदरी असेल. हा मार्ग प्रवेश नियंत्रित महामार्ग म्हणून विकसित होईल. यामुळे पुणे, मुंबई, नवी मुंबई, जेएनपीटी बंदर आणि औद्योगिक कॉरिडॉर यांच्यातील मालवाहतूक अधिक वेगवान होईल. विद्यमान मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पामुळे सध्या प्रवासाचा कालावधी सुमारे अर्ध्या तासाने कमी झाला आहे. भविष्यात या मार्गावरील वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेता नवीन मार्ग फायद्याचा ठरेल. या मार्गावर दररोज तीन लाख वाहने धावू शकतील.



### मुंबई ते बंगळुरू सहा तासांच्या आत

**» नवीन मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यात येणार आहे. त्यानंतर अंतिम मार्गरेषा, खर्च, भूसंपादन आणि बांधकामाचा आराखडा निश्चित केला जाणार आहे. सध्याच्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला समांतर असा हा मार्ग असेल. तो नवीन मुंबई-बंगळुरू महामार्गाचा भाग असेल. यामुळे भविष्यात मुंबई ते बंगळुरू हे अंतर सहा तासांपेक्षा कमी वेळेत पार करता येईल, अशी माहिती भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम यांनी दिली.**